# शेवंता जित्ती हाय!

Genre: Drama | Duration: 120 minutes | Story/Screenplay/Dialogue: Pralhad Jadhav

**One line:**

एका चालत्या रेल्वेच्या प्रसाधनगृहात 'शेवंता जित्ती हाय' हे वाक्य वाचून अस्वस्थ झालेला एक संवेदनाशील 'माणूस' 'त्या' शेवंताचा शोध घेण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावत, भ्रष्ट शासन-यंत्रणा आणि बधिर समाज-व्यवस्थेशी निकराची झुंज देत शेवंताविषयीचे सत्य नेमके काय आहे ते उजेडात आणतो आणि त्यानिमित्ताने माणसाच्या सद्सद्विवेकबुद्धीचे महत्त्वही जगाला पटवून देतो…

**Synopsis:**

चालत्या रेल्वेच्या एका प्रसाधनगृहात 'शेवंता जित्ती हाय'  हे वाक्य वाचून एक संवेदनशील 'माणूस' अस्वस्थ होतो. हा माणूस या चित्रपट कथेचा नायक आहे. 'शेवंता जित्ती हाय' हे वाक्य जणू त्याच्या मेंदूचा ताबा घेते. एक हतबल, असहाय स्त्री मदतीसाठी आपला धावा करत आहे असे त्याला वाटू लागते. आपल्या स्वतःच्या घरादाराचा ठावठिकाणा नसलेला तसेच सत्ता-संपत्ती वा तत्सम कोणत्याही वलयाचे संरक्षण नसणारा हा 'माणूस' मग शेवंताच्या शोधाचे शिवधनुष्य उचलतो आणि त्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावतो.

'शेवंता'च्या तंद्रीत असतानाच तो 'माणूस' दिसेल त्या स्टेशनवर ट्रेनमधून उतरतो आणि समोर दिसेल त्या पोलीसचौकीत शिरून सरळ तेथील पोलीस अधिकाऱ्याला अर्थात सयाजीराव कांबळे यांना या प्रकरणात लक्ष घालण्याची गळ घालतो. आधी या प्रकरणाकडे गमतीच्या पातळीवर पाहणारे कांबळे हळूहळू गंभीर होत त्यात गुंतू लागतात. माणूस आणि कांबळे हे दोघेही प्रारंभी परस्परांचा अंदाज घेत जणू अंधारात चाचपडत असतात पण एका खेडेगावातील शेवंता नावाची एक गरीब बाई खरोखरच नाहीशी झालेली आहे अशी माहिती जेव्हा त्यांना मिळते तेव्हा मात्र त्यांच्या शोधाला एक अर्थ प्राप्त होतो, दिशा मिळते आणि गतीही येते.

बाळासाहेब पाटील-खंडेराजुरीकर हा मद्य-निर्मिती आणि तोच व्यवसाय करणारा एक धनाढ्य आणि तितकाच मस्तवाल व्यापारी/पुढारी! त्यानेच शेवंताला नाहीशी केली असावी असा संशय निर्माण होतो. काही-युक्त्या प्रयुक्त्या योजून 'माणूस' त्याला त्या पोलीस स्टेशनमध्ये घेऊन येतो. कांबळे आपल्याकडील चौकशीची विविध हत्यारे वापरत आणि बाळासाहेबांच्या इतर अशाच प्रकरणांचा संदर्भ घेत त्यांच्या मानेभोवतीचा फास आवळत आणतात. पण त्याचवेळी बाळासाहेबही कांबळे यांचा भूतकाळ खोदून काढत विद्या सडोलीकर नावाच्या एका महिलेवरील

बलात्कार आणि खून प्रकरणाच्या अनुषंगाने कांबळे यांनी कशी लाच घेतली आहे हे उघड करत त्यांची खेळी त्यांच्यावरच उलटवण्याचा प्रयत्न करतात...त्या दोघांची ही दुखरी नस लक्षात घेऊन 'माणूस' त्या दोघांनाही बोलते करत जणू त्यांना आपला भूतकाळ स्वच्छ करण्याची संधी देत, सत्याच्या लख्ख प्रकाशात आणतो.

विशेष म्हणजे बाळासाहेब आणि कांबळे हे 'माणसा'च्याही भूतकाळात शिरण्यात यशस्वी होतात. लहानपणी काही ना काही कारणाने आपल्याला टॉर्चर करणाऱ्या बापाची त्या मुलाला (अर्थात माणसाला) घृणा असते. त्याच्या कडक कारभाराला, शिस्तीला आणि बाहेरख्याली वृत्तीला कंटाळून त्यांच्या पत्नीने अर्थात ('माणसा'च्या आईने) विहिरीत उडी मारून जीव दिलेला असतो. तेव्हापासून 'माणूस' जो घराबाहेर पडतो तो पुन्हा कधीच घरी परतत नाही. सारे जगच जणू त्याचे घर होऊन जाते. कुठे कोणावर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी तो सदैव धडपड करत राहतो. 'शेवंताचा शोध' हा त्याच्या याच जीवनशैलीचा भाग असतो.

'माणसा'च्या भूतकाळासंबंधीची ही माहिती जेव्हा कांबळे आणि बाळासाहेब यांना कळते तेव्हा ते चकित होतात. जगातील प्रत्येक माणूस स्खलनशील आहे आणि प्रत्येकाला आपल्या चुकीचे प्रायश्चित्त घेण्यासाठी काही ना काही सकारात्मक मार्ग शोधून काढावा लागतो; हेही त्यांच्या लक्षात येते...त्या पार्श्वभूमीवर बाळासाहेब आणि कांबळे हे दोघेही आपण केलेल्या चुकीचे प्रसिद्ध घेण्यासाठी तयार होतात...भूतकाळ कितीही कटू आणि दुःखद असला तरी तो पुसून कोणत्याही क्षणी नव्याने जीवनाची सुरुवात करता येऊ शकते या सत्य-दर्शनाने ते सारेच भूतकाळाच्या दुःखद पाशातून मुक्त होतात आणि जणू काही जगण्याचा नवा सूर त्यांना गवसतो.

या साक्षात्कारामुळे आपला प्रवास आता सुफळ-संपूर्ण झाला आहे असे कांबळे आणि बाळासाहेब यांना वाटते. पण 'माणूस' त्या क्षणी त्यांना सावध करत सांगतो की, "शेवंताचा आपला शोध अजून संपलेला नाही,आत्ताच तर आपले खरे काम सुरू झाले आहे... शेवंताच्या अशा शोध-प्रक्रियेतूनच भावी शेवंतांच्या जन्मास आपण आळा घालू शकतो"... आणि म्हणून शेवंताच्या शोधाबरोबरच विद्या सडोलीकर बलात्कार/खून प्रकरणातून निर्दोष सुटलेल्या विजयसिंह देशमुख यालाही आपल्या दुष्कृत्याची जाणीव व्हावी यासाठी माणूस शेवटी नव्या उत्साहाने नव्या कामगिरीवर निघतो...

'शेवंताचा शोध' हा जरी या चित्रपटकथेचा विषय असला तरी त्या विषयाच्या आडून माणसाच्या हरवलेल्या विवेकबुद्धीचा शोध घेऊन तिला पुन्हा सार्वत्रिक पातळीवर आपल्या दैनंदिन जगण्याचा भाग होऊ देणे ही या कथेची मूळ प्रेरणा आहे.माणसातील चांगुलपणा आणि विवेकबुद्धी यांना आवाहन करणारी ही कहाणी 'रोमांचक रहस्यकथे'च्या (suspense thriller) अंगाने पुढे जाते. एकाच वेळी ती प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण

करते,त्यांच्या उत्तराची दिशा दाखवते आणि त्यांना जगण्याचे बळही देते! बधिर समाजमन आणि एकूणच भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात बोट वर करायला लावणारी ही धाडसी कहाणी म्हणजे चुकीच्या जीवनपद्धतीचा बिमोड करून साऱ्यांनाच अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचा प्रयत्न करणारी एक लखलखीत पाऊलवाट होय!

***

(ही कथा, पटकथा आणि संवाद 'स्क्रीन रायटर्स असोसिएशनकडे' नोंदण्यात आले असून सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.

नोंदणीचा तपशील :

SWA Membership Number : 56663

Type of Creation : Script

Title of Creation : Shevanta Jitti Haaye

Date : Wednesday 2022-11-16 18:33:41

Transa. ID : 1668603720-372253139

Reference Number : 111710525161

***